**प्रेस नोट दि.२२/०२/२०२५**

**स्पा मसाज सेंटर च्या नावाखाली वेश्या व्यवसाय करणाऱ्या ॲक्वा फॅमिली स्पा सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने कारवाई केलेबाबत.**

ॲक्वा फॅमिली स्पा, द स्वेअर कमर्शियल कॉम्प्लेक्स गाळा नंबर ०९, जुनी मिल कंपाउन्ड, सोलापूर या ठिकाणी मसाज सेंटरच्या नावाखाली बेकायदेशीरपणे वेश्याव्यवसाय चालु असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर बातमीवरुन दि.२१/०२/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी छापा टाकला असता त्या ठिकाणी ०३ पिडीत महिला मिळून आल्या. पिडीतांकडून मसाज करून घेऊन त्यानंतर वेश्याव्यवसाय करून घेण्यात येत होता. सदर स्पा सेंटर हे **अक्षय** संजय होळकर वय ३२ वर्षे राहणार उत्तर कसबा सोलापूर २) आरोपी नामे श्रीनिवास शंकर गुडूर वय ३२ वर्षे हे चालविताना मिळून आले. म्हणून त्यांचेवर **पोलीस नाईक अ. सत्तार पटेल यांचे फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे गुरंन.८५/२०२५ येथे अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५, ६ सह भारतीय न्याय संहिता कलम १४३ (२)(३) १४४ (२) BNS प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.** सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडून करण्यात येत असून आरोपीना मा. न्यायालयाने आरोपीची गुन्हयाचे तपासकामी दिनांक २५/०२/२०२५ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड दिलेली आहे. याद्वारे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे मसाज सेंटरच्या नावाखाली बेकायदेशीर वेश्याव्यवसाय चालत असल्यास त्याबाबची माहिती पोलीसांना द्यावी.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त श्री. एम.राज कुमार व मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) डॉ.दिपाली काळे, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे श्री राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस निरिक्षक महादेव राऊत, सफौ. हेमंत मंठाळकर, राजेंद्र बंडगर, पोहेकॉ/ महादेव बंडगर, पोलीस नाईक अ.सत्तार पटेल, मपोहेकॉ अकिला नदाफ, मपोहेकॉ सुशिला नागरगोजे, मपोहेकॉ नफिसा मुजावर, मपोकॉ सुजाता जाधव, मपोकॉ सीमा खोगरे, मपोकॉ अरुणा परब, मपोकॉ उषा मळगे, मपोकॉ प्रिया ढेपे चालक पोकॉ दादा गोरे यांनी शिताफिने कामगीरी करून सदरचा छापा यशस्वी केला.

**(डॉ. दिपाली काळे)**
पोलीस उप आयुक्त, गुन्हे/विशा
सोलापूर शहर